# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे








दैनिक | वर्ष १ | अंक १७३ | बुधवार, १४ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210


# राज्यातील १२ झेडपींसह १२५ पंचायत समितीचे बिगुल वाजले

## ५ फेब्रुवारीला मतदान तर ७ फेब्रुवारीला निकाल

पुणे, ता. १३ : महापालिकांच्या निवडणुकांचा धुरळा उडत असतानाच राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची घोषणा केली आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींसाठी निवडणूक कार्यक्रमाची घोषणा आयोगाकडून करण्यात आली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितींसाठी ५ फेब्रुवारीला मतदान होणार असून ७ फेब्रुवारीला मतमोजणी म्हणजे निकाल लागणार आहे. यामुळे शहरांनंतर राज्यातील ग्रामीण भागांमध्ये निवडणुकांचा धुरळा उडणार आहे.

राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे आणि सचिव सुरेश काकाणी यांनी मंगळवारी (ता. १३) पत्रकार परिषदेत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची घोषणा केली. यात राज्यातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, छ. संभाजीनगर, परभणी, धाराशिव, कोल्हापूर जिल्हा परिषदेची निवडणूक होणार आहे.




या निवडणुकीसाठी १६ जानेवारी ते २१ जानेवारी उमेदवारी अर्ज स्वीकारण्याची मुदत आहे. आयोगाने निवडणुकीची घोषणा करताच १२ जिल्हा परिषदांमध्ये आचारसंहिता लागू झाली आहे.

दरम्यान, आरक्षण मर्यादा ५० टक्क्यांच्या वर गेलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक दुसऱ्या टप्प्यामध्ये घेतली जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिल्याने आता १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा परिषदा आणि पंचायत समितींच्या निवडणुकांचा कार्यक्रम पूर्ण करणे निवडणूक आयोगाला बंधनकारक असणार आहे. या निवडणुका घेण्यासाठी अधिक वेळ देण्यात यावा, अशी विनंती राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाकडे केली होती. त्यानुसार आयोगाने १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी केली होती.

**१२ जिल्हा परिषदांसाठी होणार निवडणूक**

कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव व लातूर या १२ जिल्हा परिषदांचा समावेश आहे.

**दुसऱ्या टप्प्यात इतर जिल्हा परिषद**

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण मर्यादा ५० टक्क्यांच्या वर गेलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक दुसऱ्या टप्प्यांमध्ये घेतली जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिल्याने आता १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा परिषदा आणि पंचायत समितींच्या निवडणुकांचा कार्यक्रम पूर्ण करणे निवडणूक आयोगाला बंधनकारक असणार आहे. एकीकडे राज्यात १५ जानेवारी रोजी महापालिका निवडणुकांसाठी मतदान होत असून १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे, महानगरांमध्ये निवडणुका संपताच, ग्रामीण महाराष्ट्रात निवडणुकांची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे.

### निवडणूक कार्यक्रम

- अधिसूचना १६ जानेवारी उमेदवारी अर्ज स्वीकारणार १६ जानेवारी ते २१ जानेवारीदरम्यान
- अर्जांची छाननी २२ जानेवारीला
- उमेदवारी माघारीची अंतिम मुदत २७ जानेवारी, दुपारी ३ वाजेपर्यंत निवडणूक चिन्ह आणि अंतिम उमेदवार यादी
- २७ जानेवारी दुपारी ३.३० वाजेनंतर जाहीर केली जाईल
- मतदान ५ फेब्रुवारी सकाळी ७ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत
- मतमोजणी आणि निकाल ७ फेब्रुवारीला सकाळी १० वाजल्यापासून

### संक्षिप्त

## आता चुकाल, तर मुंबईला मुकाल; उद्धव ठाकरे यांचे भावनिक आवाहन

मुंबई, ता. १३ : मुंबई आपली आहे, ती मराठी माणसाच्याच ताब्यात ठेवण्यासाठी ही निवडणूक निर्णायक आहे. आता जर चुकलात, तर मुंबईला कायमचे मुकाल, अशा शब्दांत शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईकरांना साद घातली. विमानतळ परिसरातील शाखांना भेटी देताना त्यांनी महायुतीवर जोरदार टीका केली. सत्ताधारी पक्षाकडून पैशांचा वारेमाप वापर सुरू असल्याचा आरोप करत ठाकरे म्हणाले की, गद्दार वृत्तीचा पराभव करण्यासाठी आपला विजय आवश्यक आहे. मतदारांनी हजार-दोन हजार रुपयांसाठी आपले आयुष्य विकूनये. ज्यांना आम्ही निवडून दिले ते गद्दार होऊ शकतात, पण मतदार कधीच गद्दार नसतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, पैसे वाटणाऱ्यांना पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्याचे आदेश त्यांनी शिवसैनिकांना दिले.

## मिरजमध्ये खून प्रकरणातील १५ आरोपी मोक्काच्या कचाट्यात


**मिरज, ता. १३ :** मिरज शहरातील निखिल विलास कलगुटगी खून प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई करत १५ आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) लागू केला आहे. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र श्री. सुनिल फुलारी यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली असून, या कारवाईमुळे मिरज शहरातील संघटित गुन्हेगारी टोळीचा कणा मोडला आहे.

तपासात टोळी प्रमुख प्रथमेश सुरेश ढेरे व त्याच्या साथीदारांनी २०१७ ते २०२५ दरम्यान मिरज परिसरात वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी, अपहरण, दरोडा, गंभीर दुखापत व बेकायदेशीर शस्त्र बाळगणे अशा गंभीर गुन्ह्यांची मालिका केल्याचे निष्पन्न झाले. आर्थिक फायद्यासाठी दहशत निर्माण करून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करण्यात आले होते. चालू सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारीला आळा घालण्याच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात आली आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी विपुल पाटील यांच्याकडे सोपवण्यात आला असून, यापुढेही संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर कडक व निर्णायक कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# मतदानासाठी पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक प्रमुख रस्ते बंद

**पुणे, ता. १३ :** पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची मंगळवारी सांगता झाली असून आता शहरात निवडणूक प्रक्रियेचा प्रत्यक्ष टप्पा सुरू होत आहे. १४ जानेवारीला मतपेटी वाटप, १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला मत मोजणी होणार आहे. या तीन दिवसांत शहरात वाहतूक कोंडी होऊ नये, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी वाहतूक पोलिसांनी महत्त्वाच्या मार्गांवर प्रवेश बंदी आणि वाहतुकीत बदल जाहीर केले आहेत.

पिंपरी-चिंचवड ही राज्यातील महत्त्वाची औद्योगिक आणि निवासी महानगरपालिका असून निवडणुकीच्या काळात मोठ्या प्रमाणात हालचाल वाढते. मतदान केंद्रे, स्ट्रॉंग रूम आणि मतमोजणी केंद्रांभोवती सुरक्षेची कडक




व्यवस्था ठेवण्यात आली आहे. त्यामुळे काही प्रमुख रस्ते तात्पुरते बंद ठेवण्यात येणार आहेत. निवडणुकीशी संबंधित वाहने आणि अत्यावश्यक सेवा वगळता इतर वाहनांवर हे निर्बंध लागू असतील.

भोसरी आणि चिखली परिसरात स्ट्रॉंग रूमच्या पार्श्वभूमीवर मोठे बदल करण्यात आले आहेत. भोसरीतील इंद्रायणीनगर येथील संत ज्ञानेश्वर क्रीडांगणाकडे जाणारा वैष्णवी माता मंदिर रोड आणि इंद्रायणी स्वीट कॉर्नर चौक १४ ते १६ जानेवारीदरम्यान सर्व वाहनांसाठी बंद राहील. कृष्णानगर भाजी मंडईकडून चिखली घरकुल टाऊन हॉलकडे जाणारे सेवा रस्तेही याच काळात बंद असतील. नागरिकांनी पुणे-नाशिक महामार्ग, सहारा चौक, साने चौक किंवा नेवाळेवस्ती हे पर्यायी मार्ग वापरावेत.

निगडी प्राधिकरणातील हेडगेवार भवन समोरील रस्ताही बंद करण्यात आला असून संभाजी चौकाकडून येणारी वाहतूक आकुर्डी पोलीस चौकीमार्गे हुतात्मा चौकाकडे वळवण्यात आली आहे. मतमोजणीच्या दिवशी म्हणजे १६ जानेवारीला चिंचवड ऑटो क्लस्टर परिसरातील राजमाता जिजाऊ चौक ते काळेवाडी एम्पायर पूल हा मार्ग सकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत पूर्णपणे बंद राहील. मतदानाच्या दिवशी १५ जानेवारीला मोशी, दिघी-आळंदी, चहोली, थेरगाव, कासारवाडी आणि वाकड परिसरातही काही रस्ते जड वाहनांसाठी बंद राहतील. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी आणि नागरिकांना कमीत कमी त्रास व्हावा, यासाठी हे बदल करण्यात आले असून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे.

# पुण्यात नरेश अरोरा यांच्या कार्यालयावर पोलिसांची धाड

**पुणे, ता.१३ :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार संपल्यानंतर अवघ्या ४८ तासांवर मतदान होणार असताना पुण्यातून एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांच्याशी संबंधित डिझाईन बॉक्स या कंपनीच्या कार्यालयात पुणे पोलिसांच्या क्राईम ब्रांचचे पथक पोहोचल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली होती. मात्र या प्रकरणात कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याचे स्पष्टीकरण पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहे. निवडणूक प्रचार संपल्यानंतर आणि मतदानाच्या काही तास आधीच ही घटना घडल्यामुळे तिचे राजकीय महत्त्व वाढले आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुका या राज्याच्या राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात



असून सत्ताधारी आणि विरोधी गटांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळत आहे. अशा परिस्थितीत अजित पवार यांचे निकटवर्तीय मानले जाणारे नरेश अरोरा यांच्या कार्यालयात पोलिसांची उपस्थिती ही अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरली.

नरेश अरोरा हे अजित पवार यांचे प्रमुख राजकीय सल्लागार म्हणून ओळखले जातात. लोकसभा निवडणुकीपासून डिझाईन बॉक्स ही कंपनी अजित पवार यांच्या प्रचार मोहिमेचे नियोजन, सभा आयोजन, जनसंपर्क धोरण आणि राजकीय प्रतिमा घडवण्याचे काम पाहत आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीतही या कंपनीची भूमिका महत्त्वाची मानली जाते.

मंगळवारी पुणे पोलिसांचे क्राईम ब्रांचचे पथक डिझाईन बॉक्सच्या कार्यालयात दाखल झाल्याची माहिती समोर आली होती. यानंतर राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले. मात्र पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले की, नरेश अरोरा यांच्याविरोधात कोणतीही चौकशी, कारवाई किंवा जप्ती करण्यात आलेली नाही. ही भेट नियमित तपासणीचा भाग होती, असेही त्यांनी सांगितले.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची कोणतीही हालचाल राजकीय अर्थाने पाहिली जाते. त्यामुळे ही घटना मतदारांसाठीही महत्त्वाची ठरते. पुणे आणि पिंपरी चिंचवडसारख्या आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी महानगरपालिकांवर सत्ता कोणाची राहणार, यावर राज्याच्या राजकारणाची दिशा ठरणार आहे. त्यामुळे निवडणुकीपूर्वी घडणाऱ्या प्रत्येक घडामोडीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. पोलीस आयुक्तांच्या स्पष्टीकरणानंतर हा विषय तूर्तास शांत झाला असला तरी निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात राजकीय वातावरण किती तापलेले आहे, याचे हे स्पष्ट उदाहरण मानले जात आहे. मतदानाच्या दिवशी मतदार कोणता कौल देतात, यावरच या सर्व घडामोडींचे राजकीय परिणाम ठरणार आहेत.

# मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना मत देऊ नका : मनोज जरांगे पाटील

**बुलढाणा, ता. १३ :** महाराष्ट्रातील १९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी आता केवळ२ दिवस उरले आहेत. अशातच मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. बुलढाणा येथे आयोजित एका जाहीर सभेत जरांगे पाटील यांनी मराठा समाजातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. त्यांनी मराठा समाजाला उद्देशून सत्ताधाऱ्यांविरुद्ध मतदान करण्याचे आवाहन केले आहे.

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी ही महत्त्वाची घोषणा केली आहे. त्यांनी भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना या सर्वच प्रमुख पक्षांवर टीका करत, हे पक्ष सोयीचे राजकारण करत असल्याचा आरोप केला. मतदानाच्या ४८ तास आधी जरांगे पाटील यांनी



हे विधान केल्याने उमेदवारांचे धाबे दणाणले आहेत.

जरांगे पाटील यांनी स्पष्टपणे सांगितले की, ज्या नेत्यांनी आणि पक्षांनी मराठा आरक्षणाला विरोध केला, त्यांना या निवडणुकीत मते देऊ नका. मराठा समाजाने आता आपली ताकद दाखवून देण्याची वेळ आली असून, समाजाच्या विरोधात जाणाऱ्यांना महापालिकेत पाठवू नका, असे त्यांनी म्हटले आहे.

आरक्षणाच्या मुद्द्यावरून समाजाची फसवणूक झाल्याची भावना जरांगे पाटील यांनी व्यक्त केली आहे. सत्तेत बसलेले लोक केवळ राजकारण करत असून गोरगरीब जनता एकटी पडली. नेत्यांना त्यांची जागा दाखवून देण्यासाठी ही हाक देण्यात आली आहे. जरांगे पाटील यांनी केलेल्या या आवाहनामुळे मराठा बहुल प्रभागांमध्ये मतदानाचे चित्र बदलू शकते. त्यांच्या या भूमिकेमुळे प्रस्थापित राजकीय पक्षांच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# उरुळी कांचन येथे शरद पवारांच्या राष्ट्रवादीला धक्का

## जानाई डेव्हलपर्सचे मालक सागर कांचन यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

**हनुमंत चिकणे**

उरुळी कांचन, ता. १२: शरद पवार गटाचे नेते व उरुळी कांचन येथील जानाई डेव्हलपर्सचे मालक सागर (आबा) पोपट कांचन व उरुळी कांचनचे माजी सरपंच मयूर कांचन यांच्यासह शेकडो समर्थकांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या नेतृत्वावर ठाम विश्वास व्यक्त करत सोमवारी (ता. १३) चंदननगर परिसरात हा पक्षप्रवेश पार पडला.

आगामी जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर झालेला हा प्रवेश राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, या घडामोडीने परिसरातील राजकीय समीकरणे बदलण्यास सुरुवात झाली आहे.

यावेळी शिरूर हवेलीचे आमदार माऊली कटके, जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य संतोष कांचन, राष्ट्रवादी हवेली तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर, उरुळी कांचनचे माजी सरपंच दत्तात्रय शांताराम कांचन, मयूर कांचन, माजी उपसरपंच जितेंद्र बडेकर, तंटामुक्तीचे अध्यक्ष महादेव कांचन, शिवसेनेचे काळुराम मेमाणे, सुभाष बगाडे, सामाजिक कार्यकर्ते सागर बाळासाहेब कांचन, अक्षय वनारसे, सतीश कांचन, सदाशिव भागेपल्ले, मयूर कांचन, आशुतोष तुपे, अजित कासुर्डे, अजिंक्य संतोष कांचन, आदित्य यादव, राहुल थिटे, राहुल तोडकर, सौरभ गटने, विशाल



कामठे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

ग्रामीण भागात सागर कांचन यांचा मजबूत जनसंपर्क, सामाजिक कार्यातील सक्रिय सहभाग आणि युवकांमध्ये असलेली पकड लक्षात घेता राष्ट्रवादी काँग्रेसचा जनाधार लक्षणीयरीत्या वाढल्याचे चित्र आहे. यावेळी अनेक सामाजिक कार्यकर्ते व युवकांनीही पक्षात प्रवेश करून राष्ट्रवादी काँग्रेसला ताकद दिली. या प्रवेशामुळे विद्यमान आमदार माऊली कटके यांची राजकीय ताकद अधिक भक्कम झाली आहे.

पुणे जिल्हा परिषद गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात असून ही सत्ता कायम राखण्यासाठी अजित पवार यांनी संघटनात्मक पातळीवर आक्रमक रणनीती आखल्याचे दिसून येत आहे. सागर कांचन यांचा प्रवेश हा त्याच मास्टर प्लॅनचा भाग असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

दरम्यान, शेती, पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण, आरोग्य व युवकांच्या रोजगारासाठी विकासाभिमुख आणि निर्णयक्षम नेतृत्वाखाली एकत्र काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## संक्षिप्त



### राज्यातील शाळांना सलग ५ दिवस सुट्टी

**पुणे, ता. १३ :** राज्यातील शाळांना मकरसंक्रांत आणि म हानगरपालिका निवडणुकांमुळे सलग ५ दिवस सुट्टी मिळणार आहे. या निर्णयानुसार उद्या म्हणजेच १४ जानेवारीपासून १९ जानेवारीपर्यंत शाळा बंद राहणार आहेत. महानगरपालिका निवडणुकांसाठी अनेक शाळांच्या इमारतींमध्ये मतदानासाठी केंद्रे उभारण्यात आली असल्याने हा निर्णय सुरक्षेच्या दृष्टीने घेण्यात आला आहे. प्रशासनाने मतदानाची तयारी पूर्ण केली असून ज्या शाळेत मतदान केंद्रे आहेत, त्या शाळांमधील नियमित कामकाज १४ आणि १५ जानेवारीला पूर्णपणे बंद राहणार आहे. निवडणुकीच्या प्रक्रियेत बहुतांश शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ड्युटी लावण्यात आली आहे. मतदान यंत्रांची ने-आण, साहित्याचे वाटप आणि केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था या कामात हे सर्व कर्मचारी व्यस्त राहणार असल्याने शाळा भरवणे शक्य होणार नाही. त्यामुळेच सरकारने सलग सुट्टीचे आदेश दिले आहेत. या मोठ्या सुट्टीचे महत्त्वाचे कारण म्हणजे १५ जानेवारी रोजी होणारे मतदान आणि १६ जानेवारीची मतमोजणी हे आहे. तसेच १४ जानेवारीला मकरसंक्रांतीची सुट्टी असल्याने हा सलग सुट्ट्यांचा योग जुळून आला आहे. सोमवार, १९ जानेवारीपासून राज्यातील सर्व शाळांचे शैक्षणिक कामकाज नेहमीप्रमाणे पूर्ववत सुरू होईल.

### पिसोळीत नायजेरियन तरुणाची त्याच्याच मित्रांकडून हत्या

**पुणे, ता. १३ :** पुण्यातील कोंढवा परिसरातील पिसोळीमध्ये एका नायजेरियन तरुणाची त्याच्याच मित्रांनी हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. येमेका क्रिस्टीएन (वय ४०) असे मृत तरुणाचे नाव असून तो मूळचा नायजेरियाचा होता आणि सध्या फुरसुंगी येथे राहत होता. ही घटना काल रात्री घडली. जेवण सुरू असतानाच जुन्या प्रेमप्रकरणाच्या वादावरून ख्रिश्चन आणि त्याच्या मित्रांमध्ये जोरदार भांडण झाले. या वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन त्याच्याच ४ मित्रांनी येमेकाला बेदम मारहाण केली. जखमी झालेल्या ख्रिश्चनला उपचारासाठी वानवडीतील एका खासगी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. काळेपडळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी तातडीने नायेमेका मदुबची ओनिया आणि किन्सली ओबा या दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. फरार असलेल्या इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथकेतैनात केली असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

### आई-वडिलांचा सांभाळ न केल्यास पगारातून १० टक्के कपात; तेलंगणा सरकारचा निर्णय

**तेलंगणा, ता. १३ :** वृद्ध माता-पित्यांची हेळसांड करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना तेलंगणा सरकारने मोठा दणका दिलाय. मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी घोषणा केली की, जे कर्मचारी आपल्या आई-वडिलांचा सांभाळ करणार नाहीत, त्यांच्या वेतनातून १० टक्के कपात केली जाईल. ही कापलेली रक्कम थेट पीडित पालकांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. या योजनेसाठी सरकारने ५० कोटींची तरतूद केली असून, ज्येष्ठांसाठी प्रणाम नावाचे डे-केअर सेंटरही उभारले जाणार आहे. याशिवाय, आगामी महापालिका निवडणुकांमध्ये ट्रान्सजेंडर व्यक्तींना सह-सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्याचा ऐतिहासिक निर्णयही त्यांनी घेतलाय. तसेच दिव्यांगांना मोफत उपकरणे आणि नवविवाहित दिव्यांग जोडप्यांना २ लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा करत, २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात नवीन आरोग्य धोरण आणण्याचे संकेतही मुख्यमंत्र्यांनी दिलेत.

### पुण्यातील मार्केट यार्ड व उपबाजार गुरुवारी बंद

**पुणे, ता. १३ :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत येणारे मार्केट यार्ड आणि सर्व उपबाजार गुरुवारी (ता. १५) बंद राहणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीमाल विक्रीसाठी बाजारात आणू नये, तसेच नागरिकांनी खरेदीसाठी येऊ नये, असे आवाहन बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप आणि सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांनी केले आहे. दरम्यान, मार्केट यार्डातील मुख्य बाजारातील फळे, भाजीपाला, गुळ-भुसार, केळी, फुले व पान बाजार, पेट्रोल पंप तसेच वजनकाटा विभाग बंद राहणार आहेत. यासोबतच मोशी, पिंपरी, खडकी, मांजरी आणि उत्तमनगर येथील उपबाजारही पूर्णतः बंद ठेवण्यात येणार असल्याचे बाजार समितीने स्पष्ट केले आहे.

# पुण्याच्या ९ वर्षांच्या कारभारावर अजित पवारांची जोरदार टीका

**पुणे, ता. १३ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी हडपसर येथे झालेल्या प्रचारसभेत पुण्यातील स्थानिक नेतृत्वावर जोरदार टीका केली. गेल्या ९ वर्षांत पुण्याचा कारभार ज्यांच्याकडे होता, त्या त्रिमूर्तीने शहराचा विकास करण्यात कमी पडल्याचा आरोप त्यांनी केला. केंद्र सरकारने पुणे मेट्रोसाठी आधीच निधी दिला होता, मात्र स्थानिक नेतृत्व मेट्रोच्या कामाला गती देऊ शकले नाही, असे त्यांनी सांगितले.

अजित पवार म्हणाले की, पुणेकरांनी अनेकांना संधी दिली. पण ९ वर्षांत शहरासाठी नेमके काय झाले, हे नागरिकांनी पाहिले आहे. शहराचा सर्वांगीण विकास करताना नेतृत्व कोणाच्या हातात आहे, यावर सर्व काही अवलंबून असते. सध्या पुण्याचे नेतृत्व स्थानिक पातळीवर तीन लोक करत आहेत. मात्र त्यांच्या कारभारामुळे शहराच्या विकासाला अडथळा निर्माण झाला आहे, असा आरोप त्यांनी केला.



पुण्यातील पाण्याची टंचाई ही मोठी समस्या आहे. अनेक भागांत नागरिकांना नियमित पाणी मिळत नाही. रस्ते रुंद करण्यात आले, मात्र त्यावर आवश्यक ते क्रॉसिंग झाले नाहीत. सबवे झाले नाहीत. अनेक ठिकाणी रस्त्यांच्या दुभाजकावर झाडे वाढली असून स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाले आहे. शहरात अस्वच्छता वाढत आहे. पुण्यात नदी सुधार प्रकल्प सुरू आहे, मात्र त्यापेक्षा जास्त गरज २४ तास पाणीपुरवठ्याची आहे. या सर्व बाबींमध्ये स्थानिक नेतृत्व अपयशी ठरल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

पुण्यात वाहतुकीची समस्या गंभीर झाली आहे. रस्त्यांवर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे नागरिकांना रोज ट्रॅफिकचा त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील वाहतूक नियोजन योग्य पद्धतीने होत नसल्याने अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. मतदान करताना नातेसंबंधांचा विचार न करता शहराचा कारभार कोणाच्या हातात द्यायचा याचा विचार करा, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले.

काही कलाकारांनी नाट्यगृहांमधील अस्वच्छतेबाबत तक्रारी केल्या आहेत. नाट्यगृहांमध्ये घाण असल्याचे त्यांनी सांगितले आहे. महापालिकेने खर्च कुठे करायचा आणि कोणत्या कामाला प्राधान्य द्यायचे, याचा विचार करायला हवा. शहराच्या विकासासाठी योग्य नियोजन आणि कामांची अंमलबजावणी गरजेची आहे, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

पुण्यात जातीजातींमध्ये तेढ निर्माण केली जात असल्याचा आरोप करत त्यांनी विरोधकांवरही टीका केली. यंदा आमच्या पक्षाने अनुभवी आणि नवीन उमेदवार दिले आहेत. स्थानिक लोकांच्या हातात सत्ता असून त्यांचा भ्रष्टाचार रोखायचा आहे, असे त्यांनी सांगितले. विरोधकांनी मटका चालवणाऱ्याच्या पत्नीला उमेदवारी दिल्याचा आरोपही त्यांनी केला. काही उमेदवारांचे गुंड निलेश घायवळसोबत फोटो असल्याचा दावाही त्यांनी केला.

अजित पवार म्हणाले की, २०१७ नंतर पुण्याच्या विकासाला खीळ बसली आहे. डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना पुणे मेट्रोला मंजुरी मिळाली होती, मात्र स्थानिक नेतृत्वाला कामाला गती देता आली नाही. पुण्यात मेट्रो प्रवास मोफत करण्यासाठी कॅबिनेटच्या परवानगीची गरज काय आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

पुणे महानगरपालिकेचे सध्याचे बजेट १२६०० कोटी रुपये असून पिंपरी चिंचवड महापालिकेचे बजेट ९६०० कोटी रुपये आहे. दोन्हीकडे मेट्रो आणि पीएमपीएल मोफत केल्यास पुण्याला दरवर्षी ३०० कोटी आणि पिंपरी चिंचवडला २०० कोटी रुपये द्यावे लागतील. ५०० कोटी खर्च झाल्याने फारसा फरक पडणार नाही. त्यामुळे रस्त्यावरील सुमारे १० लाख वाहने कमी होतील, असा दावा अजित पवार यांनी केला. शेवटी त्यांनी पुणेकरांना शहराची सत्ता आपल्या हातात देण्याचे आवाहन केले.

## लाडक्या बहिणींना संक्रांतीची भेट! बँकेच्या खात्यात १५०० रुपये जमा व्हायला झाली सुरुवात

**पुणे, ता. १३ :** राज्यातील लाडक्या बहिणींना मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर दिलासा मिळाला असून योजनेचा डिसेंबर महिन्याचा १५०० रुपयांचा हप्ता आजपासून बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. निवडणूक आचारसंहिता लागू असतानाही नियमित योजनेचा लाभ देण्यास राज्य निवडणूक आयोगाने परवानगी दिल्यामुळे कोट्यवधी महिलांना आज सकाळपासूनच म ोबाईलवर बँकेचे मेसेज येऊ लागले आहेत.




राज्यात महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू आहे. या काळात लाडकी बहीण योजनेचा नियमित किंवा प्रलंबित लाभ देता येईल, मात्र जानेवारी महिन्याचा लाभ आगाऊ स्वरुपात देता येणार नाही, असे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यामुळे डिसेंबर महिन्याचा १५०० रुपयांचा हप्ता महिलांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.

दरम्यान, मकर संक्रांतीपूर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यात डिसेंबर व जानेवारी महिन्याचे मिळून ३००० रुपये जमा होणार अशा बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. या बातम्यांमुळे राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यानंतर आयोगाने शासनाकडे याबाबत स्पष्टीकरण मागवले होते. मुख्य सचिवांनी आयोगाला दिलेल्या अहवालात सांगितले की, निवडणूक जाहीर होण्यापूर्वी सुरु असलेल्या योजना आचारसंहितेच्या काळात सुरु ठेवण्यास परवानगी आहे. मात्र कोणताही लाभ आगाऊ देता येणार नाही तसेच नवीन लाभार्थी निवडता येणार नाहीत.

या पार्श्वभूमीवर आयोगाने स्पष्ट निर्देश दिले की लाडकी बहीण योजनेचा नियमित लाभ देता येईल, पण ३००० रुपये आगाऊ देण्यास परवानगी नाही. त्यामुळे आजपासून मतदानाच्या दोन दिवस आधी महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. काही उमेदवारांनी सोशल मिडियावर १४ जानेवारीपूर्वी ३००० रुपये जमा होणार असल्याचे दावे केले होते. मात्र आयोगाच्या निर्णयामुळे आता केवळ नियमित १५०० रुपयांचाच हप्ता दिला जात आहे. त्यामुळे आचारसंहितेच्या कचाट्यात अडकलेली लाडकी बहीण योजना आता मार्गी लागली आहे.

## ताम्हिणी घाटात मित्राचा खुन करणाऱ्या आरोपींना अटक

**पुणे, ता. १३ :** ताम्हिणी घाटातील सणसवाडी परिसरात झालेल्या एका भीषण हत्याकांडाचा छडा पोलिसांनी लावला आहे. आर्थिक व्यवहारातील वादातून गणेश भगत या २२ वर्षीय तरुणाची त्याच्याच मित्रांनी निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. ही घटना ११ जानेवारी २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास घडली होती. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेश भगत हा त्याच्या काही मित्रांसोबत पुण्याहून महाबळेश्वरला फिरण्यासाठी निघाला होता. प्रवासादरम्यान पैशांच्या जुन्या वादावरून त्यांच्यात जोरदार भांडण झाले. दरम्यान, आरोपींनी गाडीतच दोरीने गणेशचा गळा आवळला. त्यानंतर ताम्हिणी घाटातील सणसवाडी गावाच्या हद्दीत असलेल्या एका निर्जन ठिकाणी त्याला नेण्यात आले. तिथे कोयत्याने डोक्यावर आणि गळ्यावर वार करून त्याला संपवण्यात आले आणि मृतदेह फेकून आरोपी तिथून पसार झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला हा मृतदेह आढळल्यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली होती.

सुरुवातीला या मृतदेहाची ओळख पटवणे पोलिसांसाठी कठीण काम होते, कारण मृतकाकडे कोणतीही कागदपत्रे नव्हती. मात्र पोलिसांनी मृताच्या हातातील स्म ार्टवॉचमधील माहिती आणि तांत्रिक विश्लेषण यांचा आधार घेतला. अवघ्या ६ ते ८ तासांच्या आत म ाणगाव पोलिसांनी ही कारवाई करत अनिकेत वाघमारे आणि तुषार पाटोळे यांना दोन संशयितांना ताब्यात असून अधिक तपास सुरु आहे.

## पुण्यात दोन तरुणांना टास्कच्या नादात ५१ लाखांची फसवणूक

**पुणे, ता. १३ :** शेअर बाजारातील गुंतवणूक आणि ऑनलाइन टास्कच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी शहरातील दोन तरुणांची एकूण ५१ लाख १६ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. या दोन्ही प्रकरणांमध्ये संबंधित पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

पहिला प्रकार मांजरी खुर्द परिसरात राहणाऱ्या एका तरुणासोबत घडला आहे. सप्टेंबर महिन्यात सायबर चोरट्यांनी या तरुणाशी संपर्क साधत शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास मोठा आणि खात्रीशीर परतावा मिळेल, असे आमिष दाखवले. त्यानंतर गुंतवणूकविषयक ॲपवर नोंदणी करण्यास त्याला भाग पाडण्यात आले. सुरुवातीला कमी रकमेवर परतावा देत चोरट्यांनी तरुणाचा विश्वास संपादन केला.

विश्वास बसल्यानंतर तरुणाने वेळोवेळी चोरट्यांच्या बँक खात्यात एकूण ४६ लाख ३३ हजार रुपये जमा केले. काही काळानंतर परतावा मि ळणे थांबल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आले. यानंतर तरुणाने वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी माहिती तंत्रज्ञान कायदा आणि फसवणूक कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून वरिष्ठ पोलिस निरीक्षक युवराज हांडे तपास करीत आहेत.

दुसरा प्रकार सिंहगड रस्ता परिसरात राहणाऱ्या एका तरुणासोबत घडला आहे. सायबर चोरट्यांनी घरातून ऑनलाइन कामाची संधी असल्याचे सांगून त्याच्याशी संपर्क साधला. सुरुवातीला छोटे टास्क देऊन त्याचे पैसे खात्यात जमा करण्यात आले. त्यामुळे विश्वास बसल्यानंतर अधिक पैसे गुंतविल्यास जास्त परतावा मिळेल, असे सांगून तरुणाला जाळ्यात ओढण्यात आले. तरुणाने चोरट्यांच्या खात्यात एकूण ४ लाख ८३ हजार रुपये जमा केले. मात्र, त्यानंतर कोणताही परतावा न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी वारजे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, शेअर बाजारातील खात्रीशीर परतावा किंवा घरातून ऑनलाइन कामाच्या आमिषाला बळी पडू नये, कोणत्याही ॲपवर गुंतवणूक करण्यापूर्वी खातरजमा करावी आणि अनोळखी व्यक्तींना पैसे पाठवू नयेत, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना कले आहे.

## लक्ष्मी मुक्ती योजनेअंतर्गत आता सातबाऱ्यावर पत्नीचेही नाव येणार

**पुणे, ता. १३ :** पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातून सामाजिक बदलाची एक नवी आणि सकारात्मक वार्ता समोर आली आहे. शेतजमिनीवर आता केवळ पुरुषांची मक्तेदारी न राहता त्यावर महिलांनाही समान हक्क मिळावा यासाठी शेत दोघांचे हे विशेष अभियान राबवले जात आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे शेतीच्या सातबारा उताऱ्यावर पतीसोबतच पत्नीच्या नावाची अधिकृत नोंद करणे हा आहे.

आतापर्यंत सुमारे ३६२ महिलांनी अर्ज केला असून १५० महिलांच्या नावांची नोंद सातबारा उताऱ्यावर सहहिस्सेदार म्हणून यशस्वीपणे पूर्ण झाली आहे.




ग्रामीण भागात शेतीची सुमारे ७० टक्के कष्टदायक कामे महिलाच करतात, मात्र जमिनीची मालकी त्यांच्याकडे नसते. महाराष्ट्र शासनाची लक्ष्मी मुक्ती योजने अंतर्गत हा सकारात्मक बदल केला जात आहे. पुरुषाचे निधन झाल्यावरच महिलेचे नाव जमिनीवर लावले जात असे. मात्र अनेकदा आर्थिक अडचणी किंवा कर्जबाजारीपणामुळे घरातील पुरुषाने परस्पर जमीन विकल्यास महिलांच्या हक्काचे मोठे नुकसान होते. अशा घटनांना आळा बसून महिलांना आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा मिळावी यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. पुरंदर तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने आपले हक्क मिळवण्यासाठी पुढे येत आहेत. या बदलामुळे भविष्यात महिलांना जमिनीचे कायदेशीर मालक म्हणून सन्मान मिळणार आहे. सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या या प्रक्रियेत पुरंदर तालुक्याने संपूर्ण जिल्ह्यासमोर एक आदर्श ठेवला आहे.

## द्वारका पीठाधीश्वर शंकराचार्यांनी घेतलं चिंतामणीचं दर्शन

**पुणे, ता. १३ :** श्री क्षेत्र थेऊर येथे सोमवार, १२ जानेवारी २०२६ रोजी द्वारका-शारदा पीठाधीश्वर जगद्गुरू श्री शंकराचार्य सदानंद सरस्वती स्वामीजी यांनी श्री चिंताम णी मंदिरात भेट देऊन गणपतीचे पूजन केले. अष्टविनायक तीर्थक्षेत्रांचे आध्यात्मिक महत्त्व असल्याने भेटीचे विशेष आयोजन करण्यात आले होते. यापूर्वी उत्तरेचे ज्योतिष्पीठाधीश शंकराचार्य श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती स्वामीजी यांनी या मंदिराला भेट दिली होती, आता पश्चिम पीठाचे शंकराचार्य सदानंद सरस्वती थेऊरला भेट दिल्याने या स्थानाचे महत्त्व संपूर्ण भारतात अधिक वाढले आहे.



भारतातील प्रमुख चार पीठांचे शंकराचार्य स्वामीजींनी ही यात्रा करून या स्थानी भेट द्यावी व अष्टविनायकचे महत्त्व अधोरेखित करून जगासमोर मांडावा, यासाठी प्रयत्न सुरु आहे.

या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे अष्टविनायकातील ओझर, रांजणगाव, महड, लेण्याद्री आणि पाली या देवस्थानांच्या विश्वस्तांनी एकत्र येत आपली उपस्थिती लावली. इतकेच नव्हे तर आळंदी आणि जेजुरी सारख्या महत्त्वाच्या देवस्थानांचे प्रतिनिधीही एकाच व्यासपीठावर उपस्थित होते. शंकराचार्य सदानंद सरस्वती यांनी आपण लवकरच संपूर्ण अष्टविनायक यात्रा करणार असल्याचे घोषित केले. जयंत म्हैसकर, प्रसादराव पाटील आणि मंगेश कराड यांच्या सहकार्याने संपन्न झालेला हा दिवस भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला असून, येत्या काळात इतर पीठांच्या शंकराचार्यांनाही यात्रेसाठी निमंत्रित केले जाणार आहे.

## पुणे पोलिसांच्या हातावर तुरी देऊन कुख्यात गुन्हेगार सचिन घायवळ फरार

**पुणे, ता. १३ :** पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने कुख्यात गुन्हेगार सचिन घायवळला पकडण्यासाठी जामखेड तालुक्यात मोठी मोहीम राबवली, मात्र त्याला पकडण्यात पोलिसांना अपयश आले. सचिन घायवळ एका गावातील शेतात लपून बसल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पथकाने तिथे सापळा रचला होता, परंतु पोलीस येत असल्याची पूर्वकल्पना मिळाल्याने त्याने वेळेत तिथून पळ काढला. एका महिलेने सचिन घायवळला पोलीस कारवाईची माहिती देऊन पळून जाण्यास मदत केल्याचा संशय पोलिसांना आहे.



माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचला गुन्हेशाखेलासचिनघायवळहाजामखेड तालुक्यातील एका गावात वास्तव्यास असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्या माहितीनुसार विशेष पथक तयार करून संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. मात्र पोलिस गावात पोहोचल्याची चाहूल लागताच सचिन सतर्क झाला आणि काही क्षणांतच तो घटनास्थळावरून फरार झाला. पोलिस त्याच्या अगदी जवळ पोहोचले होते, मात्र वेळेवर मिळालेल्या माहितीतून तो निसटण्यात यशस्वी ठरला.

दरम्यान, सचिनला पळून जाण्यास मदत केल्याचा संशय असलेली महिला पोलिसांच्या रडारवर आली आहे. या महिलेची ओळख पटवून तिला ताब्यात घेऊन चौकशी करण्याचे आदेश पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून कोणत्या माध्यमातून माहिती पोहोचली, याचा शोध घेतला जात आहे.

सचिन घायवळ हा कुख्यात गुंड नीलेश घायवळचा मोठा भाऊ आहे. दोघांविरोधात वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात खंडणीचा गंभीर गुन्हा दाखल आहे. कर्वेनगर आणि शिवणे परिसरातील एका नामवंत शाळेसाठी खाद्यपदार्थ आणि वाहतूक सेवा पुरवणाऱ्या खासगी कंपनीच्या संचालक महिलेकडून ४४ लाख ३६ हजार रुपयांची खंडणी उकळल्याचा आरोप आहे. या प्रकरणात १३ जणांविरोधात गुन्हा दाखल असून सचिनवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्यानंतर तो पुण्यातून फरार झाला. दुसरीकडे, नीलेश घायवळ अद्याप विदेशात फरार असून तो लंडनमध्ये वास्तव्यास असल्याची माहिती आहे. कोथरूड गोळीबार प्रकरण आणि बनावट पासपोर्ट प्रकरणात त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत. न्यायालयाने त्याला फरार घोषित केले असून त्याच्या मालमत्तेवर कारवाई सुरू आहे. प्रत्यार्पणासाठी पुणे पोलिसांनी ब्रिटिश उच्चायुक्त कार्यालयाशी पत्रव्यवहार केला आहे. तसेच नीलेशला आश्रय दिल्याप्रकरणी त्याच्या मुलाविरोधात कारवाई करता येईल का, याचीही पोलिसांकडून पडताळणी सुरू आहे.

# लायसन्स आणि आरसी बुकसाठी आता मोजावे लागणार जास्तीचे पैसे

**पुणे, ता. १३ :** पुण्यात वाहनचालकांसाठी घरपोच ड्रायव्हिंग लायसन्स आणि आरसी बुक मिळवणे आता थोडे महाग झाले आहे. परिवहन विभागाने टपाल विभागासोबत करार करून ही सेवा सुरू ठेवली असली तरी घरपोच सेवेसाठी लागणाऱ्या शुल्कात वाढ करण्यात आली आहे. यापूर्वी या सेवेसाठी नागरिकांना ५८ रुपये भरावे लागत होते, मात्र आता त्यासाठी ७० रुपये मोजावे लागणार आहेत.



ड्रायव्हिंग लायसन्ससाठी परीक्षा दिल्यानंतर किंवा नवीन वाहन खरेदी केल्यानंतर ही घरपोच सेवा लागू होते. या सेवेमुळे नागरिकांना कार्यालयात रांगेत थांबण्याची गरज राहत नाही आणि वेळेची बचत होते. लायसन्स किंवा आरसी बुक थेट घरच्या पत्त्यावर पोहोचत असल्यामुळे अनेक वाहनचालक या सेवेचा लाभ घेत आहेत.

परिवहन विभागाचे उपप्रादेशिक अधिकारी स्वप्नील भोसले यांनी सांगितले की, परिवहन विभागाच्या सूचनेनुसार घरपोच सेवेसाठीचे शुल्क वाढवणे आवश्यक होते. टपाल विभागासोबत असलेल्या करारामुळे ही सेवा सुरक्षित आणि वेळेत मिळते. नागरिकांना त्यांच्या महत्त्वाच्या कागदपत्रांची खात्रीशीर डिलिव्हरी होते, त्यामुळे ही सेवा उपयुक्त ठरत आहे.

हा नवा दर १ जानेवारीपासून लागू करण्यात आला आहे. त्यामुळे आता ड्रायव्हिंग लायसन्स किंवा आरसी बुक घरपोच मिळवण्यासाठी नागरिकांना ७० रुपये शुल्क भरावे लागणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी पुण्यासह राज्यातील अनेक शहरांमध्ये सुरू झाली आहे.

घरपोच सेवा ही वाहनधारकांसाठी सोयीची असली तरी वाढलेल्या शुल्कामुळे नागरिकांच्या खिशावर थोडा भार पडणार आहे. तरीही सरकारी कार्यालयातील गर्दी, वेळेचा अपव्यय आणि वारंवार फेऱ्या टाळण्यासाठी अनेक वाहनचालक ही सेवा घेण्यास प्राधान्य देत आहेत. त्यामुळे पुण्यातील वाहनधारकांसाठी ही सेवा उपयुक्त ठरत असली तरी आता ती थोडी महाग झाल्याचे चित्र आहे.

# मांजरी-आव्हाळवाडी-वाघोली रस्त्याची दुरुस्ती करा; युवराज काकडे यांची मागणी

थेऊर, ता. १३ : हवेली तालुक्यातील प्रमुख वाहतूक मार्ग असलेल्या मांजरी (खुर्द)-आव्हाळवाडी-वाघोली या एमडीआर ५६ (प्रमुख जिल्हा मार्ग) रस्त्याची गेल्या अनेक दिवसांपासून अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे लहान-मोठे अपघात घडत असून, या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. भविष्यात जीवितहानी होण्याची शक्यता लक्षात घेता तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या पार्श्वभूमीवर आरोग्यदूत युवराज काकडे यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडे निवेदनाद्वारे सदर रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्तीची मागणी केली आहे. काही महिन्यांपूर्वी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणकडे वर्ग करण्यात आला असून, सध्या या रस्त्याची मालकी पीएमआरडीएकडे आहे.

या रस्त्याच्या विकासासाठी पीएमआरडीएकडून यूजीसी (UGC) योजनेअंतर्गत निधी मंजूर करण्यात येणार असून, आवश्यक जमीन अधिग्रहणानंतर अंदाजे वर्षभराच्या कालावधीत या रस्त्याचे कॉँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. मात्र, सध्या रस्त्याची अवस्था अतिशय खराब झाल्याने तातडीच्या दुरुस्तीची मागणी नागरिकांकडून सातत्याने होत होती.

दरम्यान, याबाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर दुरुस्तीची निविदा काढून रस्त्याचे काम हाती घेतले जाईल, असे आश्वासन दिल्याची माहिती आरोग्यदूत युवराज काकडे यांनी दिली.



# पुण्यात भरारी पथकाचा मोठा 'सर्जिकल स्ट्राईक'; पिंपरीत १९ वॉशिंग मशीन जप्त

**पिंपरी चिंचवड, ता. १३ :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेची कडक अंमलबजावणी सुरू असून ड क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या भरारी पथकाने रहाटणी येथील गणराज कॉलनीमध्ये मोठी कारवाई केली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या भरारी पथकाने एका वाहनातून तब्बल १९ वॉशिंग मशीन जप्त केल्या आहेत. ही कारवाई १२ जानेवारी २०२६ रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास करण्यात आली.




या प्रकरणी भरारी पथकाचे प्रमुख राहुल निकम यांनी काळेवाडी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता प्रभावीपणे राबवण्यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षांतर्गत एसएसटी, एफएसटी आणि व्हीएसटी अशी विविध पथकेशहरात कार्यरत आहेत.

१२ जानेवारी रोजी रात्री १०.२३ वाजता आचारसंहिता कक्षाला रहाटणी येथील गणराज कॉलनी परिसरात मतदारांना वॉशिंग मशीन वाटप केले जात असल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत तातडीने राहुल निकम यांच्या नेतृत्वाखालील एफएसटी भरारी पथक घटनास्थळी दाखल झाले.


घटनास्थळी तपासणी केली असता एका वाहनामध्ये १९ वॉशिंग मशीन आढळून आल्या. संबंधित वाहनाचा क्रमांक एमएच १४ केए ६३३० असा असून या वाहनातून मतदारांना वस्तूंचे वाटप करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. भरारी पथकाने सर्व वॉशिंग मशीन जप्त करून पुढील कारवाईसाठी काळेवाडी पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिल्या आहेत.

निवडणूक काळात मतदारांना आमिष दाखवण्याच्या प्रकारांवर कडक कारवाई करण्यात येत असून अशा घटनांवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथके सतर्क आहेत. नागरिकांनीही अशा प्रकारची माहिती तातडीने प्रशासनाला देण्याचे आवाहन निवडणूक प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# मनपा निवडणुकीसाठी पोलीस यंत्रणा सज्ज

**पुणे, ता. १३ :** राज्यातील बहुप्रतिक्षित महानगरपालिका निवडणुकांसाठी गुरुवारी (दि.१५) मतदान होणार असून, दहा दिवसांच्या जोरदार प्रचाराची रणधुमाळी मंगळवारी (ता. १३ ) थांबली आहे. मतदान प्रक्रिया शांततेत आणि निर्भय वातावरणात पार पडावी यासाठी प्रशासनासह पुणे पोलीस दल पूर्णतः सज्ज झाले आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तब्बल १२ हजारांहून अधिक पोलिस अधिकारी व अंमलदारांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष लक्ष ठेवले जाणार असून, प्रत्येक हालचालीवर बारकाईने नजर ठेवली जाईल, अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.



मतदान केंद्रांवर चारस्तरीय सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. यामध्ये पोलिस अंमलदार, वरिष्ठ निरीक्षक, सहाय्यक आयुक्त आणि उपायुक्त यांचा समावेश आहे. मतदान केंद्रांवर होणारे वादविवाद, अनुचित प्रकार किंवा कायदा सुव्यवस्थेला बाधा पोहोचवणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखेची पथकेही सतर्क ठेवण्यात आली आहेत.

शहरात कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी ४५४ झोन तयार करण्यात आले असून, प्रत्येक झोनमध्ये संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक व सहाय्यक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली सतत पेट्रोलिंग केले जाणार आहे. या कारवाईचा आढावा थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिला जाणार आहे. पुणे शहरात एकूण ३,९८३ मतदान केंद्रे असून, प्रत्येक केंद्रावर एक पोलिस कर्मचारी व एक होमगार्ड तैनात राहणार आहे. याशिवाय स्थानिक पोलिसांचा स्वतंत्र बंदोबस्त असेल. ९१३ इमारतींमध्ये मतदान प्रक्रिया पार पडणार असून, त्या प्रत्येक ठिकाणी दोन पोलिस अंमलदार नेमण्यात आले आहेत. शहरातील ९० संवेदनशील मतदान केंद्रांवर अतिरिक्त बंदोबस्त ठेवण्यात आला असून, त्या ठिकाणी प्रत्येकी एक अधिकारी आणि पाच पोलिस कर्मचारी तैनात असतील. तसेच ८ क्यूआरटी (क्विक रिस्पॉन्स टीम) सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. यासोबतच सहा अतिवरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येकी ५० पोलिस अंमलदारांचे स्ट्रायकिंग फोर्स तयार करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

संपूर्ण बंदोबस्ताची जबाबदारी पोलिस आयुक्त व सहआयुक्त यांच्या देखरेखीखाली पार पडणार असून, चार अप्पर पोलिस आयुक्त, १४ पोलिस उपायुक्त, सुमारे ७ हजार पोलिस अधिकारी-अंमलदार, ३ हजार होमगार्ड आणि एसआरपीएफच्या चार कंपन्या तैनात असतील. याशिवाय चारचाकी वाहनांद्वारे ५०० पोलिस कर्मचारी पेट्रोलिंग करणार असून, शहरात सर्वत्र कडेकोट सुरक्षा ठेवण्यात आली आहे.

महानगरपालिका निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी पुणे पोलीस दल पूर्ण क्षमतेने सज्ज झाले असून, नागरिकांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## रताळे की बटाटा आपल्या आतड्यांसाठी सर्वात उपयुक्त काय आहे?

**पुणे, ता. १३ :** आपल्या स्वयंपाकघरात बटाटे आणि रताळे दोन्ही असतात. परंतु यापैकी आपल्या आरोग्यासाठी सर्वात उत्तम काय हे जाणून घेणे गरजेचे आहे. बटाट्याला भाज्यांचा राजा म्हणून ओळखले जाते. तर रताळे हे गोड चवीसाठी आणि त्यातील असलेल्या पोषक तत्वांसाठी ओळखले जातात. आपल्या आतड्यांचे आरोग्य केवळ पचनपुरते मर्यादित नाही. आतड्यांचे चांगले आरोग्य थेट रोगप्रतिकारक शक्ती, रक्तातील साखर नियंत्रण, वजन आणि अगदी मूडशी जोडलेले आहे.

आपण आहारात जे खातो ते फार महत्त्वाचे मानले जाते. बटाटे कार्बोहायड्रेट्सने समृद्ध मानले जातात, परंतु त्यात काही घटक असतात जे आतड्यांसाठी फायदेशीर मानले जातात. बटाट्यामध्ये आढळणारा प्रतिरोधक स्टार्च लहान आतड्यात पचत नाही तर थेट मोठ्या आतड्यात पोहोचतो. तिथे ते चांगल्या बॅक्टेरियासाठी अन्न म्हणून काम करते आणि आतड्यांचे मायक्रोबायोम मजबूत करते. बटाट्यामध्ये फायबर, व्हिटॅमिन सी आणि बी६ देखील असतात, जे पचन प्रक्रियेला आधार देतात. परंतु एखाद्याला गॅस, आम्लता किंवा पोटफुगीचा त्रास होत असेल तर बटाट्याचे जास्त सेवन धोकादायक असू शकते.

रताळे हे बटाट्यांपेक्षा सर्वात उत्तम पर्याय मानला जातो. रताळ्यामध्ये फायबर आणि प्रीबायोटिक असतात. आतड्यांच्या आरोग्यासाठी हे फार गरजेचे असतात. रताळ्याच्या सालींमध्ये फायबर भरपूर असते, जे आतड्यांमध्ये चांगल्या बॅक्टेरियाच्या वाढीस प्रोत्साहन देते. रताळ्यामुळे आपले पचन सुधारण्यास मदत होते. तसेच बद्धकोष्ठता यासारख्या समस्यांपासून मुक्तता मिळते. रताळ्यामध्ये प्रतिरोधक स्टार्च देखील मुबलक प्रमाणात असतो. यामुळे रक्तातील साखर हळूहळू वाढते आणि पोट जास्त काळ भरलेले राहण्यास मदत होते.

रताळ्यामध्ये बटाट्यांपेक्षा जवळजवळ दुप्पट फायबर असते. हे फायबर योग्य पचन राखण्यास, पोटफुगी कमी करण्यास आणि आतड्यांचे आरोग्य राखण्यास मदत करते. बटाट्यांमध्ये कमी फायबर असले तरी, त्यांचा प्रतिरोधक स्टार्च आतड्यांतील बॅक्टेरियासाठी फायदेशीर आहे. बटाटे असोत किंवा रताळे तळल्याने किंवा अति मसल्यांचा वापर केल्याने यातील पोषण मूल्य कमी होते. म्हणूनच बटाटे किंवा रताळे उकडवून खाणे अधिक उत्तम.



## ‘बजाज डोमिनार ४००’ पोलिसांच्या ताफ्यात दाखल

**पुणे, ता. १३ :** पुणे शहर , पिंपरी चिंचवड आणि ग्रामीण भागात पोलिसांसाठी बजाज ऑटो कंपनीने एक मोठे पाऊल उचलले आहे. बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ या उपक्रमाचा भाग म्हणून पुणे शहर, पिंपरी चिंचवड आणि पुणे ग्रामीण पोलीस दलाला १०० अत्याधुनिक डोमिनार ४०० मोटार सायकली भेट देण्यात आल्या आहेत. शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालय मैदानावर आयोजित एका विशेष सोहळ्यात या गाड्यांचे अधिकृत हस्तांतरण करण्यात आले. यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, विनयकुमार चौबे आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह बजाज कंपनीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या शक्तिशाली मोटार सायकलींचा वापर सुरुवातीला १९ ते २३ दरम्यान होणाऱ्या ४३७ किलोमीटरच्या सायकल स्पर्धेसाठी केला जाणार आहे. त्यानंतर या गाड्या पोलिसांच्या नियमित गस्तीसाठी ताफ्यात सामील होतील. पोलिसांना गुन्हेगारांचा पाठलाग करणे आणि तातडीच्या प्रसंगी घटनास्थळी जलद पोहोचणे सोपे व्हावे, या उद्देशाने या गाड्यांची खास बांधणी करण्यात आली आहे. शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांत या गाड्या अत्यंत कार्यक्षम ठरतील.

या डोमिनार ४०० गाड्यांमध्ये पोलिसांच्या कामासाठी अनेक आधुनिक सोयीसुविधा देण्यात आल्या आहेत. यामध्ये दळणवळणासाठी सायरन, शक्तिशाली एलईडी दिवे आणि सार्वजनिक घोषणा करण्यासाठी लाऊडस्पीकर बसवण्यात आले आहेत. तसेच, वॉकी-टॉकी आणि मोबाईल चार्जिंगसाठी पॉईंट्स, जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीम आणि प्रथमोपचार किटची सुविधाही उपलब्ध आहे.

# श्री क्षेत्र थेऊर येथील स्वामी समर्थ नगर अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजन संपन्न

## युवराज काकडे यांच्या समाजोपयोगी कामांवर नागरिक खुश

**थेऊर, ता. १३ :** श्री क्षेत्र थेऊर येथील मौजे थेऊरमधील स्वामी समर्थ नगर अंतर्गत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली. गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

या रस्त्याच्या कामासाठी पहिल्या टप्प्यात ५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, उर्वरित रस्त्याचे काम पुढील काळात टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्यदूत युवराज काकडे यांनी दिली.

भूमिपूजन प्रसंगी बबनमामा बोडके, सुखराज आण्णा कुंजीर, रमेशआप्पा कुंजीर, गुलाबतात्या कुंजीर, रामभाऊबापू कुंजीर, बाळासाहेब कुंजीर, प्रकाश कुंजीर, शिवाजीआण्णा कुंजीर, योगेश कुंजीर, राणू कुंजीर, सोमनाथ बनसोडे, सुनील मुद्दा यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, या वेळी नागरिकांनी रस्त्याचे काम मंजूर होऊन त्वरित सुरू झाल्याबद्दल युवराज काकडे यांच्याबद्दल समाधान व्यक्त करत सर्वांचे आभार मानले.



### लाडक्या बहिणींच्या खात्यात १५०० रुपये जमा

**पुणे, ता. १३ :** राज्यातील लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. २९ महानगरपालिका निवडणुकांच्या आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाने या योजनेचा नियमित हप्ता वितरीत करण्यास हिरवा कंदील दाखवलाय. त्यामुळे संक्रांतीपूर्वीच महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा होण्यास सुरुवात झालीय.

आचारसंहितेमुळे अग्रिम लाभ देण्यास किंवा तीन हजार रुपये एकरकमी देण्यास आयोगाने स्पष्ट मज्जाव केला होता. मात्र, मुख्य सचिवांच्या अहवालानंतर सुरू असलेल्या योजनांना परवानगी मिळाली. डिसेंबर महिन्याचा हप्ता देण्यात आलाय. १५ जानेवारीला होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाला महत्त्व प्राप्त झाले असून, नवीन लाभार्थी निवडण्यावर मात्र बंदी कायम आहे. नियमित निधी मिळाल्याने महिलावर्गात समाधानाचे वातावरण आहे.

## दौंडच्या भीमा शुगरकडून १६ जानेवारीनंतर गाळपास येणाऱ्या उसाला प्रतिटन २०० रूपयांचे अतिरिक्त अनुदान

**दौंड, ता. १३ :** दौंड तालुक्यातील पाटसच्या एम.आर.एन. भीमा शुगर पॉवर प्रा. लि (निराणी शुगर्स लि.) या कारखान्याच्या वतीने गाळप हंगाम २०२५-२६ करिता येणाऱ्या प्रतिटन उसाला ३१०० रूपये पहिला हप्ता दिलेला आहे. १६ जानेवारीनंतर गाळपास येणाऱ्या उसाला प्रति टन २०० रूपये अतिरिक्त अनुदान दिले जाणार आहे. थोडक्यात १६ जानेवारीनंतर गाळपास येणाऱ्या उसाला प्रति टन ३३०० रूपये ऊस दर मिळणार असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष आमदार ॲड. राहुल कुल यांनी दिली आहे.

हंगाम २०२५-२६ करिता आलेल्या उसाचा अंतिम दर दौंड तालुक्यातील इतर कारखान्यांच्या बरोबरीने देणार असल्याचे ॲड राहुल कुल यांनी आश्वस्त केले आहे. कारखान्याने १२ जानेवारीपर्यंत ५ लाख ४० हजार ८४८ टन उसाचे गाळप केले असून, ५ लाख ३१ हजार ५० क्विंटल साखर उत्पादीत केली आहे. कारखान्याचा सरासरी साखर उतारा ११.३४ टक्के राखला आहे.



कारखान्याच्या आसवनी प्रकल्पतून आतापर्यंत ८ लाख ८४ हजार ८६३ लिटर उच्च प्रतीचे इथेनॉल उत्पादीत केले असून २६ लाख ७७ हजार ३२१ लिटर रिक्टिफाईड स्पिरिट उत्पादीत केले आहे. सहवीज निर्मिती प्रकल्पतून आज अखेरीस २ कोटी १७ लाख ५९ हजार ५३७ युनिट्स वीज निर्मिती केली असून १ कोटी ६७ लाख ५८ हजार २३७ युनिट्स स्ववापर करून ५१ लाख ८२ हजार २०० युनिट वीज निर्यात केली आहे.

या वर्षी कारखान्याच्या इतिहासात प्रथमच एका दिवसात ११,००० टन ऊस गाळप केले असल्याचे एमआरएन भीमाचे कार्यकारी संचालक रविकांत पाटील यांनी दिली आणि त्याच बरोबर कारखान्याच्या सभासदांनी आपल्या हक्काच्या कारखान्याला जास्तीत जास्त ऊस देऊन सहकार्य करावे असे आवाहन रविकांत पाटील यांनी केले.

कारखान्याला ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांचे, कारखान्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि युनियन पदाधिकाऱ्यांचे निराणी ग्रुप्सचे अध्यक्ष मुरुगेश निराणी, एक्झिक्युटीव्ह डायरेकटर संगमेश निराणी, ग्रुपचे कार्यकारी संचालक विजय निराणी व संचालक विशाल निराणी यांनी आभार मानले.

## निवडून येणार नाही कळल्यावर आम्ही काहीही जाहिरनामे काढतो

**पुणे, ता. १३ :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संवाद पुणेकरांशी या कार्यक्रमात अभिनेत्री गिरीजा ओक हिने मुलाखत घेतली. या मुलाखतीत फडणवीस आम्हीराजकारणीलोकंनिवडूनयेणार नाही कळल्यावर काहीही जाहिरनामे काढतो, अशी जाहीर कबुली दिली आहे. यावेळी बोलताना फडणवीस यांनी निवडून येणार नाही कळल्यावर आम्हीही काहीही जाहिरनामे काढतो, अशी जाहीर कबुली दिली. त्यावरून लोकांनी पोटातलं ओठावर आलं अशी प्रतिक्रीया दिली आहे.

काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मेट्रोचा प्रवास सर्वांना मोफत करायला हवा असं वक्तव्य केलं होतं. त्यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, आज मी जाहीर करणार होतो की पुण्यातून उडणाऱ्या सर्व विमानांची तिकीटं



महिलांसाठी मोफत करायला हवी. जाहीर करायला आपल्या बापाचं काय जातं? आम्ही राजकीय क्षेत्रातील लोकं, निवडणूक जिंकण्याच्या हव्यासापोटी जेव्हा आम्हाला माहित असतं की आम्ही जिंकून येऊ शकत नाही तेव्हा आम्ही काहीही जाहीरनामे काढतो, त्या जाहीरनाम्यात काहीही म्हणतो. तरी मला वाटतं की लोकांचा विश्वास बसेल अशा तरी गोष्टी म्हटल्या पाहिजे, असे फडणवीस यावेळी म्हणाले.

## मुंबईत ठाकरेंच्या सेनेला ४५ तर मनसेला २० जागा मिळतील : चंद्रकांत पाटील

**मुंबई, ता. १३ :** राज्यातील मुंबईसह २९ महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. या निवडणुकीत सगळ्यात चर्चेत असलेली निवडणूक ही मुंबई महापालिकेची ठरली आहे. मुंबईत भाजप शिवसेनेच्या युतीने तगडे नियोजन केल्याचे पाहायला मिळाले. तर दुसरीकडे ठाकरे बंधूंनी देखील निवडणूक आपल्या हातात घेऊन सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली.

मुंबईचा महापौर कोण होणार? या एका प्रश्नावर निवडणूक गाजली. या सगळ्यात आता भाजपचे ज्येष्ठ नेते मंत्री चंद्रकांत पाटील यांनी थेट शिवसेना उबाठा आणि मनसेच्या किती जागा मुंबईत येऊ शकतात, याचे आकडे सांगत भाकित वर्तवले आहे.



ठाकरे बंधूंना राजकीय आणि कुटुंबीकदृष्ट्या एकत्र येण्यासाठी तब्बल २० वर्षांचा काळ लोटला गेला. कुठच्याही भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे, असे म्हणत राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत मुंबई महापालिकेसाठी राजकीय युती केली. या निवडणुकीसाठी ठाकरे बंधूंना किती यश मिळेल हे १६ तारेखेला समजेलच, तत्पूर्वी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भाकित वर्तवत मुंबईत ठाकरेंच्या सेनेला ४५ तर मनसेला २० जागा मिळतील, असा मोठा दावा केला आहे.


ते सांगलीत निवडणुकीच्या प्रचारासाठी आले असताना त्यांनी हा दावा केला आहे. सांगली महापालिकेत भाजपचाच महापौर होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. इतक्यावरच न थांबता राज्यातील २९ पैकी २८ महापालिकेत युतीचे महापौर होतील, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले आहेत.

दरम्यान, सर्वाधिक महापौर हे भाजपचेच असतील, असा दावाही पाटील यांनी केला आहे. यामुळे निवडणुकांचा निकाल लागण्याअगोदरच चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केलेली भविष्यवाणी राज्याच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरत आहे.

## दबावाच्या राजकारणाला आता पूर्णविराम : शशिकांत शिंदे

पिंपरी, ता. १३ : महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १७ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) च्या वतीने भव्य प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. भोईरनगर येथील जयवंत प्राथमिक शाळेच्या मैदानावर पार पडलेल्या या सभेत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आक्रमक शैलीत भाजपवर जोरदार टीका केली. या सभेस प्रभाग क्रमांक १७मधील अधिकृत उमेदवार मनिषा आरसूळ, भाऊसाहेब भोईर, शोभा वाल्हेकर आणि शेखर चिंचवडे उपस्थित होते.

शशिकांत शिंदे म्हणाले, पिंपरी चिंचवड शहराचा विकास फक्त राष्ट्रवादी काँग्रेसनेच केला. येथील स्वच्छ रस्ते, राजीव गांधी आयटी पार्क असे अनेक कामे केली आहेत. त्याचबरोबर अनेक रिकाम्या हातांना रोजगार दिला. भाजपने सुसंस्कृत असल्याचे ढोंग करू नये.



सरकारमधील सर्व यंत्रणा आपल्याच बापाच्या असल्यासारख्या वापरल्या जात आहेत. ठरवून, प्लॅन करून विरोधकांवर दबाव टाकण्याचे राजकारण सुरू आहे. पण पिंपरी-चिंचवडची जनता हुशार आहे, ती हे सर्व ओळखते. ज्या पक्षाने शिस्तीचे धडे दिले, त्या पक्षातच आता शिस्त राहिलेली नाही. जर शिस्तच उरली नसेल, तर आरएसएसच्या प्रमुखांनी त्यांचे कान टोचावेत. भाऊसाहेब भोईर म्हणाले, प्रभाग क्रमांक १७ मध्ये हिंदू-मुस्लिम सर्व समाजातील नागरिक गुण्यागोविंदाने एकत्र राहत असून येथे कधीही धर्माच्या नावावर भेदभाव करण्यात आलेला नाही. सर्वधर्मसमभाव आणि एकतेच्या विचारावर विश्वास ठेवूनच या प्रभागाचा विकास करण्यात आला आहे. आम्ही सत्तेत असताना सर्व समाजांना सोबत घेऊन अनेक लोकहिताची आणि समाजहिताची कामे प्रामाणिकपणे राबवली असून, पुढील काळातही हाच समन्वय, सलोखा आणि विकासाचा विचार पुढे नेण्याचा आमचा निर्धार आहे. ही निवडणूक केवळ उमेदवारांची नाही, तर आपल्या स्वाभिमानाची आहे.

दरम्यान, दबाव, धमकी आणि अहंकाराच्या राजकारणाला उत्तर देण्याची वेळ आली आहे. प्रभाग १७ चा सर्वांगीण विकास हवा असेल, आपल्या एका मताने पिंपरी-चिंचवडचे भविष्य ठरवा!

## मतदानाचा कालावधी एका तासाने कमी करण्याचा निर्णय; भूषण गगराणी यांची माहिती

मुंबई, ता. १३ : मुंबई महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, त्यासाठी मुंबई महानगरपालिका आणि निवडणूक यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे. मुंबईत एकूण एक कोटींपेक्षा अधिक मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मात्र, यावेळी मतदानाचा कालावधी एका तासाने कमी करण्यात आल्याने अनेक मतदान केंद्रांवर गर्दी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



महापालिका निवडणुकीसाठी मतदानाची वेळ सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच अशी निश्चित करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांमध्ये हाच कालावधी लागू राहणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिली. याआधी विधानसभा निवडणुकीत मतदानाची वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ अशी होती. निवडणुकीच्या तयारीबाबत महापालिका मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हाधिकारी फरोग मुकादम यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, मतदारांसाठी सोयी, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्प, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि मार्गदर्शक सूचना यांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे गगराणी यांनी स्पष्ट केले. मुंबईत एकूण १ कोटी ३ लाख ४४ हजार ३१५ मतदार असून त्यात ५५ लाख १६ हजार ७०७ पुरुष, ४८ लाख २६ हजार ५०९ महिला आणि १ हजार ९९ अन्य मतदारांचा समावेश आहे. शहरात २ हजार २७८ ठिकाणी १० हजार २३१ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. मुंबईत १ लाख ६८ हजार दुबार मतदार असून त्यापैकी ४८ हजार ६२८ मतदारांनी आधीच हमीपत्र दिले आहे.

उर्वरित दुबार मतदारांवर नियंत्रण ठेवण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे. मतदार माहिती चिठ्ठीचे वितरण सुरू असून १२ जानेवारीपर्यंत सुमारे ६० लाख चिठ्ठ्या घरोघरी पोहोचवण्यात आल्या आहेत. निवडणूक शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले आहे.

## हडपसरच्या सभेत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी भाजपवर डागली तोफ

**पुणे, ता. १३ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हडपसर येथे झालेल्या प्रचारसभेत पुण्यातील स्थानिक नेतृत्वावर जोरदार टीका केली. गेल्या ९ वर्षांत पुण्याचा कारभार ज्यांच्याकडे होता, त्या त्रिमूर्तीने शहराचा विकास करण्यात अपयश आल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र सरकारने पुणे मेट्रोसाठी आधीच निधी दिला होता, मात्र स्थानिक नेतृत्वामुळे मेट्रोच्या कामाला अपेक्षित गती मिळाली नाही, असा आरोप त्यांनी केला.

अजित पवार म्हणाले की, पुणेकरांनी अनेकांना संधी दिली. मात्र ९ वर्षांत शहराच्या



सर्वांगीण विकासासाठी ठोस काम झाले नाही. शहरात पाण्याची टंचाई आहे, रस्ते रुंद करण्यात आले पण क्रॉसिंग आणि सबवे झाले नाहीत. अनेक ठिकाणी दुभाजकावर झाडे वाढली असून अस्वच्छता वाढली आहे. नदी सुधार प्रकल्प सुरू असला तरी पुण्याला खरी गरज आहे ती २४ तास पाणीपुरवठ्याची. वाहतुकीची समस्या गंभीर झाली असून याकडे स्थानिक नेतृत्वाने दुर्लक्ष केल्याचे त्यांनी सांगितले.

मतदान करताना नातेसंबंधांचा विचार न करता शहराचा कारभार कोणाच्या हातात द्यायचा याचा विचार करा, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. काही कलाकारांनी नाट्यगृहांमधील अस्वच्छतेबाबत तक्रारी केल्या आहेत. महापालिकेच्या खर्चाचा योग्य प्राधान्यक्रम ठरवणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

पुण्यात जातीजातींमध्ये तेढ निर्माण केली जात असल्याचा आरोप करत त्यांनी विरोधकांवरही टीका केली. आमच्या पक्षाने यंदा अनुभवी आणि नवीन उमेदवार दिले असून स्थानिक भ्रष्टाचार रोखण्याचा आमचा निर्धार आहे, असे त्यांनी सांगितले. विरोधकांनी मटका चालवणाऱ्याच्या पत्नीला उमेदवारी दिल्याचा आरोपही त्यांनी केला.

अजित पवार म्हणाले की, २०१७ नंतर पुण्याच्या विकासाला खीळ बसली. डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना पुणे मेट्रोला मंजुरी मिळाली होती, मात्र स्थानिक नेतृत्व अपयशी ठरले. पुण्यात मेट्रो आणि पीएमपीएल मोफत केल्यास रस्त्यावरील १० लाख वाहने कमी होतील, असा दावा करत त्यांनी पुणेकरांना शहराची सत्ता आपल्या हातात देण्याचे आवाहन केले.